GB GLOBAL
GIVING BACK

CIN : L17120MH1984PLC033553

**Date: 16th November, 2022**

To,
The Manager
Listing Department
The Bombay Stock Exchange Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai - 400 001

**Script code: 533204**

To,
The Manager
Listing Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, C-1, Block-G,
Bandra Kurla Complex, Bandra (E)
Mumbai - 400 051

**Symbol: GBGLOBAL**

Dear Sir / Ma'am,

**Sub: Copy of Advertisement published in Newspaper(s) - Extract of Unaudited Financial Results for the quarter and half year ended on 30th September, 2022**

In terms of Regulation 47 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed copies of Extract of Unaudited Financial Results for the quarter and half year ended on 30th September, 2022, published in Financial Express (English) Newspaper, Mumbai Lakshadeep (Marathi) Newspaper, Vartha Bharati (Kannada) Newspaper and NavaKal (Marathi) Newspaper on Wednesday, 16th November, 2022.

You are requested to take the same on your records.

Thanking you,
Yours faithfully,
For **GB GLOBAL LIMITED (Formerly Mandhana Industries Limited)**

Komal

**Komal Jhawar**
**Company Secretary**
**Membership No.: A59271**

**Encl: as above**

# कंबोडियाचे पंतप्रधान हुन सेनांना कोरोना

■ बाली



**कंबोडियाचे** पंतप्रधान हुन सेन यांना कोरोनाची लागण झाली आहे. जी-२० शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी सेन इंडोनेशियातील बालीमध्ये पोहोचले होते. तत्पूर्वी त्यांनी कंबोडियातील नोम पेन्ह येथे झालेल्या आग्नेय-आशियाई राष्ट्रांच्या शिखर परिषदेदरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांच्यासह अनेक जागतिक नेत्यांची भेट घेतली. कंबोडियाचे पंतप्रधान हुन सेन यांनी त्यांच्या फेसबुकवरील पोस्टमध्ये लिहिले की, मला कोरोना विषाणूची लागण झाली आहे. जी-२० शिखर परिषद सोडून कंबोडियाला परतत आहे. जी-२० परिषदेनंतर बँकॉक येथे होणाऱ्या आशिया-पॅसिफिक इकॉनॉमिक कोऑपरेशन गटाच्या बैठकीत उपस्थित राहणार आहे.

दरम्यान, रविवारी दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांच्या शिखर परिषदेचे ते यजमान होते. परिषदेत सेन यांनी अनेक नेत्यांची समोरासमोर भेट घेतली. बायडेन व्यतिरिक्त त्यांनी जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा, कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो, रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव, चीनचे पंतप्रधान ली केकियांग आणि इतर अनेक नेत्यांची भेट घेतली.




# हिजाबविरोधी आंदोलनात सहभागी आंदोलकाला कोर्टाने फाशी सुनावली

■ तेहरान

**इराणमध्ये** १६ सप्टेंबर रोजी सुरू झालेली हिजाबविरोधी निदर्शने अजूनही सुरुच आहेत. नुकतेच या आंदोलनात सहभागी झालेल्या एका व्यक्तीला तेहरान कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली आहे.

या व्यक्तीवर इमारतींना आग लावणे, दंगली भडकविणे व कट रचणे असे आरोप ठेवण्यात आले आहेत. तसेच अन्य पाच जणांना १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. रविवारी निदर्शनात सहभागी झाल्याबद्दल ७५० हून अधिक लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते.

सप्टेंबरमध्ये निदर्शने सुरू झाल्यापासून तेहरानमध्ये दोन हजारांहून अधिक लोकांवर आरोप ठेवण्यात आले आहेत. तसेच हिजाबविरोधी आंदोलनात सहभाग घेतल्याने अनेकांना अटकही झाली आहे. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. याविरोधात निदर्शने करणाऱ्यांना अटक करून मारण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. परंतु येथील पोलिसांनी हे दावे फेटाळून लावले आहेत.

# सरकारविरोधात शिवसेना आक्रमक शनिवारी आक्रोश आंदोलन करणार

■ मुंबई

**मुंबईतील** मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या म्हाडाच्या ३८८ इमारतींमध्ये ३८ हजार रहिवाशी राहत आहेत. म्हाडाच्या या इमारतींची दुरावस्था झाल्यामुळे त्यांचा पुनिर्विकास होणे गरजेचे आहे. या ३८८ म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासाचे धोरण तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी जाहीर केले होते. मात्र सध्याच्या सरकाने त्या धोरणाला अंतिम मंजुरी न देता प्रलंबित ठेवले आहे. सरकारच्या या वेळकाढू धोरणामुळे रहिवाशांच्या घरांचा पुनर्विकासाचा प्रश्न रखडला आहे. याविरोधात शिवसेना आक्रमक झाली असून येत्या शनिवार, १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत भारतमाता सिनेमागृह लालबाग येथे आमदार अजय चौधरी यांच्या नेतृत्वाखाली आक्रोश आंदोलन छेडण्यात येणार आहे.


याबाबत बोलताना शिवडी विधानसभेचे आ. अजय चौधरी म्हणाले की, मुंबई शहरातील १४ हजार उपकर प्राप्त व जुन्या इमारतींमधील लाखो रहिवाशी मालकांच्या आडमुठ्या भुमिकेमुळे जीव मुठीत घेऊन राहतात. त्या इमारतींच्या पुनर्विकास धोरणाबाबत विधानसभेमध्ये एकमताने कायदा मंजुर केला परंतु राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी गेले. दीड वर्षे कायदा प्रलंबित राहिला आहे. राज्य व केंद्र सरकारच्या श्रेय वादामुळे पुनर्विकास धोरण जाहीर केले जात नाही. झोपेचे सोंग घेतलेल्या व मुंबईकर द्वेष्ट्या सरकारचे डोळे उघडण्यासाठी व सरकारच्या श्रेयवादी आडमुठ्या भुमिकेविरोधात आक्रोश आंदोलन आयोजित केले आहे, असेही चौधरी यांनी सांगितले.

# कोल्हापुरात अवकाश स्थानकाचे सात मिनिटांचे विलोभनीय दर्शन

■ कोल्हापूर

**कोल्हापूरच्या** अवकाशात सोमवारी अनोखी घटना घडली. मानवनिर्मित अवकाश स्थानकाचे तब्बल ७ मिनिटे लोकांना विलोभनीय दर्शन झाले. अवकाश स्थानकाचा वेग प्रचंड असतो. त्यामुळे ते अल्पकाळ दिसते. प्रखर प्रकाश, प्रदूषण आणि ढगाळ हवामान यामुळे अनेकांना ते पाहता आले नाही. परंतु अनेकांनी ते पाहिले.

अवकाशात घडणाऱ्या अनेक घटना खगोल शास्त्रज्ञ आणि अभ्यासकांसाठी मोठी पर्वणी असते. परंतु सोमवारी कोल्हापूरमध्ये एक वेगळी घटना घडली. ६ वाजून २६ मिनिटांनी तेथील आकाशात मानवनिर्मित अवकाश स्थानक दिसले. अवकाशातून दक्षिण-पूर्व दिशेकडून उत्तरेकडे पृथ्वीवरून सरासरी ६२ अंश डिग्री एवढ्या उंचीवरून गेलेल्या या स्थानकाचा वेग प्रचंड होता. सूर्योदयापूर्वी काही क्षण अगोदर त्याचे दर्शन झाले. सूर्याचा प्रकाश स्थानकाच्या सोलर पॅनलवरून परावर्तित होताच ते चमकते आणि त्याचे दर्शन होते. रविवारी आणि सोमवारी अनेक खगोल अभ्यासकांनी हे स्थानक जवळपास ७ मिनिटे पाहिले. कळंबा, पुईखडी भागातील उंच टेकडीवरून त्याचे चांगले दर्शन होईल, असे शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक प्राध्यापक डॉ. राजीव व्हटकर यांनी सांगितले.



# परळ येथील शिरोडकर हायस्कूलमध्ये मुख्यमंत्री शिंदेंनी बालदिन साजरा केला

■ मुंबई

**१४ नोव्हेंबर** हा बालदिन म्हणून साजरा केला जातो. क्षा.म.स.शिक्षण संस्थेत अर्थात डॉ. शिरोडकर हायस्कूलमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांसोबत मनसोक्त गप्पा मारून बालदिन साजरा केला. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र गावकर यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे नेतृत्व संस्थेच्या सरचिटणीस ॲड. भक्ती जोगल यांनी केले. विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांना त्यांच्या आवडी-निवडीबाबत विचारले. मराठी शाळा वाचविण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न करीत आहात? असा थेट सवाल या लहान मुलांनी मुख्यमंत्र्यांना विचारला. मुख्यमंत्र्यांच्या पांढऱ्या कपड्यावरून आणि त्यांच्या दाढीबद्दल मिश्किल प्रश्न मुलांनी विचारले.



मुख्यमंत्र्यांनी देखील मुलांशी सहजपणे सुसंवाद साधला. या कार्यक्रमात प्रशालेतील सुमारे ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. संस्थेच्या सर्व विभागातील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचा या कार्यक्रमात सहभाग होता. संस्थेचे सर्व पदाधिकारीदेखील यावेळी आवर्जून उपस्थित होते.

# लोटे एमआयडीसीतील स्फोटात जखमी झालेल्या व्यक्तीचा मृत्यू

■ रत्नागिरी

**खेड** तालुक्यात लोटे एमआयडीसी येथील डिव्हाईन केमिकल कंपनीमध्ये झालेल्या स्फोटात सात कामगार जखमी झाले होते. त्यातील कामगार संदीप गुप्ता नावाच्या या गंभीर जखमी कामगारावर नवी मुंबईत उपचार सुरू होते. काल सोमवारी रात्री त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर इतर जखमी कामगारांवर अद्याप उपचार सुरू आहेत.

खेड तालुक्यातील लोटे एमआयडीसी येथील डिव्हाईन केमिकल कंपनीमध्ये रविवारी दुपारी भीषण स्फोट झाला. या स्फोटात कंपनीतील एकूण ७ जण भाजले गेले होते. त्यातील ५ जणांना नवी मुंबई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तर दोन जणांवर चिपळूण येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या स्फोटात कामगार संदीप गुप्ता देखील गंभीररित्या जखमी झाला होता. त्यामुळे त्याच्यावर नवी मुंबई येथील ऐरोली येथील बर्निंग हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. मात्र, सोमवारी रात्री उशिरा संदीप गुप्ताचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

**सात कामगार जखमी**

# जळगाव दूध संघाच्या निवडणुकीत एकनाथ खडसे गटाचा पहिला विजय



■ जळगाव

**जळगाव** जिल्हा दूध संघाच्या यंदाच्या चुरशीच्या होणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांच्या गटाने पहिला विजय मिळवला आहे. अर्ज छाननीनंतर रावेरमधून एकनाथ खडसे यांच्या समर्थकाचा बिनविरोध विजय झाला आहे. रावेर मतदारसंघातून जगदीश लहू बढे यांचा विजय झाला आहे.

जळगाव जिल्हा सहकारी दूध संघाच्या निवडणुकीसाठी काल छाननीचा शेवटचा दिवस होता. यामधून निवडणुकीत विविध मतदारसंघासाठीच्या लढती स्पष्ट झालेल्या आहेत. यात रावेर मतदारसंघातून जगदीश लहू बढे यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची निवड निश्चित झाली आहे. ते आमदार एकनाथ खडसे यांचे कट्टर समर्थक असून, ते आधीच्या संचालक मंडळातही निवडून आले होते.

या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपले विजयाचे खाते उघडले आहे. दरम्यान, काल छाननीनंतर दूध संघातील लढतींचे प्राथमिक चित्र स्पष्ट झाले आहे. आता माघारीच्या कालावधीत काही उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. यानंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र या निवडणुकीतील पहिली बाजी ही राष्ट्रवादी काँग्रेसने व अर्थातच एकनाथ खडसे यांनी मारल्याचे दिसून आले आहे. यावेळी शिंदे गट आणि भाजप एकत्र लढत आहे.

# मुंबईतील १९९३ बॉम्बस्फोटाचा कट दाऊदच्या घरी रचला होता

■ मुंबई

**मुंबईतील** १९९३ साली १२ मार्च रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोटामुळे मुंबईसह देशही हादरला होता. यात गुजरात एटीएसकडून अटक करण्यात आलेले ४ आरोपी बॉम्बस्फोट प्रकरणातील मुख्य सुत्रधार असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाचा अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या घरी कट रचण्यात आला होता, अशी सीबीआयने आरोपपत्रातून न्यायालयाला माहिती दिली आहे. १९९३ साली मुंबईमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटामध्ये पहिल्यांदा गुजरात दहशतवाद विरोधी पथकाने चार फरार आरोपींच्या मुसक्या आवळल्या होत्या. या चार आरोपींमध्ये सय्यद कुरेशी, शोएब कुरेशी उर्फ शोएब बाबा, युसूफ भटका, अबू बकर यांना गुजरात एटीएसकडून अटक करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाचा ताबा सीबीआयने घेतला होता. या सर्व तपासादरम्यान या ४ आरोपींच्या विरोधात सीबीआयने दोषारोपपत्र दाखल केले होते. त्यामध्ये गंभीर खुलासे करण्यात आले.हे ४ आरोपी सगळ्यात मोठे मास्टरमाईंड होते. या बॉम्बस्फोटाचा कट अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या घरी रचण्यात आला होता. यावेळी हे ४ आरोपी दाऊदच्या कटात सामील होते. त्यानंतर ही सर्व घटना घडली, असा दावा सीबीआयने दाखल केलेल्या दोषारोप पत्रामध्ये केला आहे.

**सीबीआयची माहिती**

# 'समृद्धी'च्या जोड रस्त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया थांबवा अन्यथा आंदोलन उभारू


■ शहापूर, प्रतिनिधी

**शहापूर**-मुरबाड-खोपोलीकडे जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ रस्त्यासाठी बाधित झालेल्या जमिनीचे भूसंपादन आधीच प्रक्रिया प्रलंबित असताना मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाला जोडण्यासाठी शहापूर जवळील जोडमार्गासाठी पुन्हा नव्याने जमीन संपादन करण्याचा घाट शासनाकडून घातला जात असल्याने तालुक्यातील मौजे गोठेघर, कांबरे, बामणे येथील शेतकरी संतप्त झाले आहेत.

भूसंपादनामुळे अनेक शेतकरी भूमिहीन होणार असल्यामुळे परिसरातील सर्व शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. त्यांनी भूसंपादन अधिकारी यांना ताबडतोब भूसंपादनाची प्रक्रिया थांबवावी अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व प्राधिकरणाच्या माध्यमातून समृद्धी महामार्गाला जोडण्यासाठी शहापूर जोड रस्ता केला जाणार आहे. जेथून रस्ता जाणार आहे त्या परिसरातील शेतकऱ्यांच्या मालकी हक्काची आणि कब्जे वहिवाटीची जमिनीचे क्षेत्र बाधित होणार आहे. त्यामुळे या जोड रस्त्याला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे.

शहापूर जोडरस्त्यासाठी जमीन संपादन केल्यास बरेच शेतकरी भूमिहीन होणार, असे हरिशचंद्र डिंगोरे या शेतकऱ्याने सांगितले.

**शेतकऱ्यांचा इशारा**



# वैभववाडी ते मुंबई एसटी पुन्हा सुरू करण्याची प्रवाशांची मागणी

■ वैभववाडी

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातून मुंबईला जाण्यासाठी प्रवाशांना एकही थेट एसटी बस नसल्याने तालुक्यातील प्रवाशांची मोठी कुचंबना होत आहे. त्यामुळे वैभववाडी - परळ ही रातराणी एसटी गाडी पुन्हा सुरू करावी, अशी मागणी तालुक्यातील प्रवाशांकडून होत आहे. १० ते १५ वर्षांपूर्वी ही रातराणी एसटी सुरू होती, पण कालांतराने कोकण रेल्वे झाल्यानंतर ही गाडी बंद करण्यात आली.

वास्तविक गगनबावडा आगार सुरू झाल्यानंतर गगनबावडा-उंबर्डेमार्गे बोरीवली आणि गगनबावडा-परळ आणि त्याहीआधी तिथवली- मुंबई अशा गाड्या सुरू होत्या. तसेच वैभववाडी-परळ मुंबई या नावाने रातराणी एसटीही सुरू होती. पण कोकण रेल्वे सुरू झाल्यानंतर एसटीचा प्रवाशी रेल्वेकडे वळू लागला. त्यामुळे भारमानाचे कारण पुढे करत यापुढे एक एक करत एसर्टा बंद करण्यात आल्या. मात्र सध्या याच मार्गावरून खासगी आराम बसेस वर्षभर धावताना दिसतात.

# सांगलीच्या पलुसमध्ये रुळावरून इंजिन घसरले

■ सांगली

**सांगली** जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील वसगडे येथे रेल्वे इंजिनचे चाक घसरल्याची घटना आज सकाळी घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. पुणे-मिरज-लोंढा दुहेरीकरण विद्युत केबल कामासाठी आलेल्या इंजिनबाबत हा प्रकार घडला. त्यामुळे मिरज-पुणे मार्गावरील रेल्वे सेवा काही काळ विस्कळीत झाली होती. याबाबतचे दुरुस्ती काम पूर्ण केल्यानंतर काही तासांनी या मार्गावरील रेल्वे सेवा पूर्ववत करण्यात आली.

# खा. नवनीत राणांना कोर्टाचा तात्पुरता दिलासा

■ मुंबई

**बोगस** जातपडताळणी प्रमाणपत्र प्रकरणी खासदार नवनीत राणांना तात्पुरता दिलासा दिला असून, १९ नोव्हेंबरच्या पुढील सुनावणीपर्यंत त्यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट बजावणार नाही, अशी हमी सरकारी वकिलांनी शिवडी दंडाधिकारी न्यायालयात दिली आहे. या प्रकरणी नवनीत राणा आणि त्यांच्या वडिलांविरोधात मुलुंड पोलिसात गुन्हा दाखल असून, शिवडी कोर्टाने नवनीत राणांविरोधात अजामीनपात्र वॉरंट बजावण्याची कारवाई केली होती.

SBI
भारतीय स्टेट बँक
कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

सूचना

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्सफर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली - ११००५५ (इमेल आयडी: sbi.igr@alankit.com) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक पासून | प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत | विभिन्न क्रमांक पासून | विभिन्न क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०१५४७१२३ | मिनेश पारेख | १५०० | १३९५६४ | १३९५६४ | ७४१६२४८२२१ | ७४१६२४९७२० |
| २ | ०७४०६३२६ | वर्गीस अब्राहम पी | ९९० | ६२०७००७ | ६२०७००७ | ८०११९४३७५७ | ८०११९४४७४६ |
| ३ | ०७४०५४९५ | जॉन फिलिप<br>अन्नम्मा जॉन फिलिप | १५४० | ६२०६१८१ | ६२०६१८१ | ८०११३९९४६६ | ८०११४०१००५ |

वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.

स्थळ: मुंबई
दिनांक: १६.११.२०२२
समभागांची संख्या: ४०३०
स.प्रमाणपत्रांची संख्या: ३
महाव्यवस्थापक (शेअर्स व बॉण्ड्स)

जीबी ग्लोबल लिमिटेड
(पूर्वीची मंधाना इंडस्ट्रीज लिमिटेड म्हणून ज्ञात)
सीआयएन : L17120MH1984PLC033553
नोंदणीकृत कार्यालय : १० वा मजला, देव प्लाझा, अंधेरी अग्निशमन केंद्राच्या समोर, एस. व्ही. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८.
मदूर. : ०२२ - ४३५३ ९१९१. ई-मेल आयडी : cs@gbglobal.in वेबसाइट : www.gbglobal.in

दि. ३०.०९.२०२२ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश
(रक्कम रु. लाखांत, उत्पन्न प्रतिशेअर वगळता)

| अ. क्र. | तपशील | स्थायी - तिमाहीअखेर ३०.०९.२०२२ अलेखापरीक्षित | तिमाहीअखेर ३०.०६.२०२२ अलेखापरीक्षित | तिमाहीअखेर ३०.०९.२०२१ अलेखापरीक्षित | सहामाहीअखेर ३०.०९.२०२२ अलेखापरीक्षित | सहामाहीअखेर ३०.०९.२०२१ अलेखापरीक्षित | वर्षअखेर ३१.०३.२०२२ लेखापरीक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परिचालनातून एकूण उत्पन्न | ३०२५.७५ | ४४२१.०० | ४६६.७३ | ७४४६.७५ | १५४९.०७ | ९७३२.४३ |
| २ | कालावधीकरिता (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपूर्व) निव्वळ नफा/(तोटा) | (८६३.२१) | १२९.९४ | (१९०८.७८) | (७३३.२७) | (४२७१.३२) | (५२१४.३०) |
| ३ | करपूर्व कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) निव्वळ नफा/(तोटा) | (८६३.२१) | १२९.९४ | (१९०८.३२) | (७३३.२७) | १११३०३.८३ | ११०३५६.९३ |
| ४ | करपश्चात कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) निव्वळ नफा/(तोटा) | (६८१.२३) | (१३.६५) | (१०५०.५७) | (६९४.८८) | ११२१६४.८६ | १११०७६.१५ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न)(करपश्चात यांचा समावेश) | (६१७.०८) | (७७.८०) | (१०५०.५७) | (६९४.८७) | ११२१६४.८५ | ११०८१९.५६ |
| ६ | समभाग भांडवल | ५००३.३१ | ५००३.३१ | ५००३.३१ | ५००३.३१ | ५००३.३१ | ५००३.३१ |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता) | | | | | | |
| ८ | उत्पन्न प्रतिशेअर (रु.) (प्रत्येकी रु. १०/-) | १२८२.०९ | १८३८.१६ | २२१७.२३ | १२८२.०९ | ३०७८.२५ | १८५४.९५ |
| | प्रत्येकी रु. १०/- च्या अपवादात्मक बाबीपूर्व ईपीएस : मूलभूत व सौम्यीकृत | (१.३६) | (०.०३) | (२.१०) | (१.३६) | (१०.२९) | (१४.८४) |
| | प्रत्येकी रु. १०/- च्या अपवादात्मक बाबीपश्चात ईपीएस : मूलभूत व सौम्यीकृत | (१.३६) | (०.०३) | (२.१०) | (१.३९) | २२४.१८ | २६५.६७ |

टीप :
१. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत बॉम्बे स्टॉक एक्सचेंज लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाकडे दाखल करण्यात आलेल्या दि. ३०.०९.२०२२ रोजी संपलेली तिमाही व सहमाही अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट्स अर्थात www.bseindia.com व www.nseindia.com वर तसेच कंपनीची वेबसाइट www.gbglobal.in वर उपलब्ध आहे.
२. दि. ३०.०९.२०२२ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या वरील निष्कर्षांचे संचालक मंडळाच्या लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन व शिफारस करण्यात आली असून त्यानंतर संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. १४.११.२०२२ रोजी अयोजित सभेमध्ये सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ च्या अटीअंतर्गत त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. वरील निष्कर्ष हे कंपनीच्या लेखापरीक्षकांद्वारे मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन आहेत.
३. वरील वित्तीय निष्कर्ष हे कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १३३ सहवाचन त्याअंतर्गत जारी संबंधित नियमांतर्गत विहित भारतीय लेखा मानकांनुसार (आयएनडी एएस) तयार करण्यात आले आहेत.

संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने
जीबी ग्लोबल लिमिटेड
सही/-
देव ठक्कर
अध्यक्ष

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४.११.२०२१

No.3
CIVIL COURT PUNE MAHARASHTRA
IN THE COURT OF SHRI M. P. SHINDE
11TH JOINT C.J.S.D AND ADDL C.J.M. PUNE, Pune City, Pune.
SUMMONS TO APPEAR IN PERSON
(0.5, R.3.)
Spl.C.S./1344/2020
Prakash Kundalik Gaikwad Vs Dilip Ramchandra Kamble
NEXT DATE : 22-12-2022
To.
Subhash Ramchandra Kamble
Sangavi Saandas, Tal.Haveli, dist.Pune
Whereas **Prakash Kundalik Gaikwad** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this court in person on the **22-12-2022 at 11:00 o'clock in the forenoon** to answer the claim, and you are directed to produce on that day all the documents upon which you intend to rely in support of your defence.
Take notice that, in default of your appearance of the day before mentioned, the suit wil be heard and determined in your absence.
Given under my hand and the seal of the Court this **23-09-2022**
**11TH JOINT C.J.S.D AND ADDL C.J.M. PUNE**
Visit ecourts.gov.in for updates or download mobile app **"eCourts Services"** from Android or iOS
The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical Signature not applied.

No.3 Fx-14
CIVIL COURT PUNE MAHARASHTRA
IN THE COURT OF SHRI M. B SHINDE
11TH JOINT CJ.S.D AND ADDL C.J.M PUNE, Pune City, Pune.
SUMMONS TO APPEAR IN PERSON
(0.5, R.3.)
Spl.C.S./1344/2020
Prakaslı Kundalik Gaikwad Vs Dilip Ramchandra Kamble
NEXT DATE : 22-12-2022
To.
Santosh Ramchandra Kamble
Sangavi Saandas, Tal.Haveli, dist.Pune
Whereas **Prakash Kundalik Gaikwad** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this court in person on the **22-12-2022 at 11:00 o'clock in the forenoon** to answer the claim, and you are directed to produce on that day all the documents upon which you intend to rely in support of your defence.
Take notice that, in default of your appearance of the day before mentioned, the suit wil be heard and determined in your absence.
Given under my hand and the seal of the Court this 23-09-2022
**11TH JOINT C.J.S.D AND ADDL C.J.M. PUNE**
Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app **"eCourts Services"** from Android or iOS
The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical Signature not applied.